# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.**

**/ फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web.ropune.org.in**

**महत्वाचे/**
**कालमर्यादा दिनांक ३०/१२/२००९**
जा.क्र.विकापु/विवि/महाराष्ट्र टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सीटी/२००९-१०/११९७९ दिनांक : २९/१२/२००९

प्रति,
संचालक, / प्राचार्य,
शासकीय/ अशासकीय अनुदानित / विना अनुदानित
पदवी / पदव्यूत्तर पदवी अभियांत्रिकी / वास्तुशास्त्र /
औषधनिर्माण शास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी /
पदव्यूत्तर पदवी व्यवस्थापन एम बी ए / एम सी ए

विषय : राज्यात महाराष्ट्र टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सीटी स्थापन करण्याबाबत

संदर्भ : मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनसलय, महाराष्ट्र राज्यृ, मुंबई यांचे पत्र क्र
२/एलजीसी/ महाराष्ट्र टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सीटी/२००९/२३०३
दिनांक १८/१२/२००९

उपरोक्त विषयासंदर्भात या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व पदवी आणि पदव्यूत्तर संस्थांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र युनिव्हर्सीटी फॉर हेल्थ सायन्सेस, नाशिक या विद्यापीठांअंतर्गत राज्यातील सर्व मेडिकल डिग्री व पोष्ट ग्रॅज्युएट डिग्री कोर्सेस चालविणा-या सर्व संस्था सुरु असून सदर विघापिठाशी सलग्नित आहेत. व सर्व अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांची परिक्षा महाराष्ट्र युनिव्हर्सीटी फॉर हेल्थ सायन्सेस, नाशिक यांच्या मार्फत घेतली जाते. त्याच प्रमाणे राज्यातील अभियांत्रिकी /औषधनिर्माण शास्त्र/ वास्तुशास्त्र /हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी तसेच एमई/ एम फार्म/ एमबीए/एमएमएस व एमसीए पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रम व इतर तंत्रशास्त्र अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांना एकच विघापीठाअंतर्गत आणून संलग्नित करण्यास तसेच सर्व अभ्यासक्रमाची परिक्षा एकाच विघापीठा मार्फत घेण्याच्या संदर्भात राज्यात टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सीटी स्थापन करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे.

या अनुषंगाने सर्व पदवी आणि पदव्यूत्तर पदवी संस्थां कळविण्यात येते की, राज्यात टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी स्थापन कारुन सर्व अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र संस्थांना सदर विद्यापीठाशी सलंग्नीत करुन व अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र अभ्यासक्रमाची परिक्षा एकाच विद्यापीठामार्फत घेण्याबाबत आपले मत काय आहे याबाबत लेखी स्वरुपात माहिती त्वरित या कार्यालयास दिनांक **३०/१२/२००९ पूर्वी** सादर करावी. जेणे करुन सदरची माहिती शासनास त्वरित सादर करण्यात येईल.

(डी.एन.शिंगाडे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत : श्री शिन्दे एस. बी., प्रोग्रॅमर यांना कळविण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.